महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७

ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्र.२/तंशिसं/एनजीसी/युपीएससी/२०२६/DTEM-D2/68/2026-DESK 2

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर

**विषय : सन २०२६-२७ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी आयोजीत दिनांक १९.०७.२०२६ रोजी होणाऱ्या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षेची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाढीव सहभागासाठी निदर्शनास आणून देण्याबाबत..**

संदर्भ : सचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई यांचे पत्र क्र.एसआएसी/ २०२६-२७/सीईटी/जाहिरात/३६८, दि.२७.०५.२०२६

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांनी राज्यातील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत मराठी विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा याकरीता संचालनालयातील अधिनस्त असलेल्या सर्व विभागीय संहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय / अशासकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२६-२७ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात विभागातील महाविद्यालयातील शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परिपत्रकाव्दारे निदर्शनास आणुन देण्याबाबत विभागीय कार्यालयाच्या स्तरावरून आदेशीत करण्याकरीत सुचित केले आहे. सामाईक प्रवेश परीक्षेची जाहीरात सर्व सहसंचालक यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबतची सुचना देण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास विनंती केली आहे. सोबत पत्राची प्रत सहपत्रांसह जोडण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परीक्षेत मराठी विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा याकरीता आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थामधील विद्यार्थ्यांकडून नागरी सेवा पुर्व परीक्षा २०२६-२७ साठीची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात परीपत्रकाव्दारे निदर्शनास आणुन सदर प्रशिक्षणांस सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

Digitally signed by
SUNIL SUKHADEO BHAMARE
Date: 04-06-2026 16:19:57

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई - ४००००१ यांना माहीतीसाठी

पत्र प्राप्त झाले
29 MAY 2026
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

**महाराष्ट्र शासन**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)

(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२६-२७/सीईटी/जाहिरात/386 दिनांक- 26-05-2026

प्रति,

मा.संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमासमोर
धोबी तलाव, मुंबई-१

**विषय- सन २०२६-२७ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी आयोजीत दिनांक १९.०७.२०२६ रोजी होणाऱ्या एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षेची माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाढीव सहभागासाठी निदर्शनास आणून देणेसाठीचे परिपत्रक तसेच संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दी बाबत.**

मा.महोदय,

शासन निर्णय क्रमांक प्रीआय/५४१९/प्र.क्र.२४०/मशि-२ दि.०१.११.२०२२ अन्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी(यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले ॲकेडमी पुणे इ.केंद्रामधील प्रवेश परीक्षेसाठी दि.१९.०७.२०२६ रोजी ऑफलाईन सामाईक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या करिता इच्छूक पात्र उमेदवारांकडून online पद्धतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या(युपीएससी) परीक्षेत राज्यातील मराठी विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता यावा याकरिता आपल्या संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नागरी सेवापूर्व परीक्षा २०२६-२७ साठी प्रवेशाकरिताच्या सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात आपल्या विभागातील महाविद्यालयातील शिकणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना परिपत्रकाव्दारे निदर्शनास आणून देण्याबाबत सर्व सहसंचालकांना

आपल्या स्तरावरुन आदेशित करण्यात यावे, तसेच सोबतची सामाईक प्रवेश परीक्षेची जाहिरात सर्व सहसंचालक यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबतची सूचना व्हावी अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

**सोबत -जाहिरातीची प्रत**

आपली विश्वासू

Patole

**(डॉ.भावना पाटोळे)**
संचालक
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई
तथा समन्वयक एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा

प्रत- मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

GOVERNMENT OF MAHARASHTRA

**State Institute For Administrative Careers (SIAC), Mumbai**

**Hajarimal Somani marg, Opposite Chhatrapati Shivaji Maharaj Terminus,Mumbai**

**Advertisement**

Online application from degree holders of all the faculties are invited for the Common Entrance Test for free full-time coaching for Union Public Service Commission, Entrance Examination 2026, given at Govt. of Maharashtra's State Institute for Administrative Careers (SIAC), Mumbai and Pre-IAS Training Centres (PITCs), Nashik, Kolhapur, Aurangabad, Amravati and Nagpur under the Higher and Technical Education Department, Dr. Ambedkar Competitive Examination Guidance Centre (ACEC), YASHADA, Savitribai Phule Academy, Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC), Pune.

**Timetable of Admission Process:**

| | | |
|---|---|---|
| 1. | Online Application | **Dt. 01.06.2026 to 17.06.2026** |
| 2 | Last date for payment of fees | **Dt. 19.06.2026** |
| 3 | Date of Offline Examination | **Dt. 19.07.2026** |

**Note:-**

1.The final merit list will be prepared on the basis of the combined marks obtained by the candidate in online examination and personal interview and the coaching center for which they have opted.

2.The candidates may login to the admission portal to select the option of coaching center after the declaration of the results of the online examination.

3.Visit official website of SIAC, www.siac.org.in for the detailed advertise, syllabus and eligibility criteria for the Common Entrance Test, instructions to fill the online examination form, reservation criteria for admission, information regarding stipend given by State Government to the students, and any other relevant information.

4.Admissions will be granted on the basis of the combined performance in written examination and interview. The schedule of the interview will be declared after the written examination.

5.Students will not be provided information regarding CET on individual basis. All information pertaining to the CET will be displayed on the official website of SIAC.

For detailed notification, syllabus of the examination, eligibility conditions and other information pertaining to the online application for CET refer to www.siac.org.in.

Date: 31.05.2026
Place: Mumbai

sd/-
Director, SIAC, Mumbai
Nodal Officer, Common Entrance Test

**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण विभाग आयोजित**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC) व्दारे घेण्यात
येणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण २०२६ करिता

**सामायिक प्रवेश परीक्षा (CET)-२०२६-२७**

उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकादमी पुणे इ. संस्थांमार्फत केंद्रिय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२७ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे (Offline Mode) आयोजन दि:१९.०७.२०२६ रोजी करण्यात येत आहे.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक:-**

ऑनलाईन अर्ज सुरूवात दिनांक:- ०१.०६.२०२६ ते १७.०६.२०२६

परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक :- १९.०६.२०२६ पर्यंत

प्रवेश परीक्षा दिनांक :- १९.०७.२०२६ (Offline Mode)

**टिप-**

१. विद्यार्थ्यांचे प्रवेश हे लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील गुणांच्या आधारे ठरवले जाणार असल्यान मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.

२. सामायिक प्रवेश परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग इन करून
त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

३. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.

सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती **www.siac.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक:-३१.०५.२०२६
स्थळ:- मुंबई

**सही/-**

**(डॉ. भावना पाटोळे)**

संचालक,
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई
तथा समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा